# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि. ०९/०५/२०२३

दुखापत:—

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | नांदगाव पेठ अप.क्र.१६९/२३ कलम ३२४, ५०४ भादवि | शेंदोळा बु. ता.जि. अमरावती | दि.०८/०५/२३ चे १९/०० वा. दि.०८/०५/२३ चे २१/०० वा. दि.०८/०५/२३ चे २३/१९ वा. | बंडु बापुरावजी उके वय ४५ वर्षे रा. शेंदोळा बु. ता.जि. अमरावती | सुनिल जाधव वय ४० वर्षे रा. शेंदोळा बु. ता.जि.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे घरी हजर असता आरोपी याने जुन्या मोबाईलचे कारणावरुन वाद घालुन घरापाशी चालत असतांना आरोपी याने फिर्यादीस शिविगाळ करुन हातात विट घेवुन फिर्यादीचे डाव्या डोक्याच्या कानाच्या साईडने मारल्याने रक्त निघाले त्यानंतर आरोपी तेथुन निघुन गेला असे फिर्यादी यांनी त्यांचे बयाणात सांगीतल्याने अशा फिर्यादी यांचे बयाणा वरुन व मेडी. सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

विनयभंग :–

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | राजापेठ अप क ४२४/२०२३ कलम ३५४, ३५४(ड) ३२३,५०४ ,५०६ भा. द.वी. | अमरावती | दि.२७/०२/२०२३ पासुन्न दि.०८/०५/२०२३ पर्यत वेळ ११.०० वा<br><br>दा. ता. वेळ दि. ०८/०५/२०२३ चे १४.५० वा. | एक महिला | राहुल वानखडे वय 22 रा. जेवड नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी यातिल नमुद आरोपी हा फिर्यादीस ति कॉलेजमध्ये येत जात असतांना पाठलाग करुन मी तुझ्यावर प्रेम करतो असे म्हणत होता. फि . यांनी नकार दिल्यने फिर्यादीस थापडांनी मारहाण केली आज दि. 08/5/23 रोजी फि हे कॉलेजमध्ये परीक्षा देण्याकारीता गेली असता आरोपीने तिचे वर्गात जावुन शिवीगाळ केली व थापडांनी मारहाण केली. तसेच अंगावरील कपडे ओढतान केले बाहेर असलेले फि चे वडील यांना सुध्दा आरोपीने शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली व पुन्हा फि ओढतान करुन जमीनीवर खाली आपटुन लाथा बुक्यांनी मारहाण केली अशा फि हिची जबानी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

ऑनलाईन आर्थिक फसवणूक :—

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | सायबर पोलीस स्टेशन अमरावती शहर अप.नं. १९/२०२३ कलम ४१९,४२० , भा.द.वि. सहकलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा | अलहीलाल कॉलनी व्ही.एम.व्ही. रोड अमरावती | दि. ०६/०४/२३ चे १७.०० वा. ते दि. २८/०४/२०२३ चे २१.३२ वा. दरम्यान दि. ०८/०५/२०२३ चे १९.५५ वा | श्री. इम्रान नजर खान वय-३३ वर्ष,व्यवसाय-खाजगी नौकरी, रा. अलहीलाल कॉलनी व्ही.एम.व्ही. रोड अमरावती | १) HDFC BANK A/C No. ५०१००६०९५६८५०५, IFSC Code HDFC०००४३२४, २) HDFC BANK A/C No. ५०१००६०९५६८५१८ , IFSC Code HDFC०००४३२४, ३) YES BANK A/C No. ०३४६६३४००००१२८९, IFSC Code YESB००००३४६, ४) YES BANK A/C No. ०१६४६३४००००३३०१, IFSC Code YESB००००००१ बॅक खाते धारक व UPI ID धारक तसेच व्हास्टअप मोबाईल क्रमांक +९१७०२६१८७८९१ | हकिकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फि.हे युट्युबवर व्हीडिओ पाहत असतांना त्यांना एक जाहीरात दिसली त्यामध्ये मुव्ही रेटींग केल्यास बोनस व कमिशन मिळेल असे नमुद होते. नमुद जाहीरात मधील लिंक वर क्लिक केले असता रजीस्ट्रेशन करुन फि.यांना ३० मुव्ही तिकीट रेटींगकरीता मिळाल्या नमुद तिकीटे रेटींग केल्यानंतर फि.यांना पहील्यांदा ८५०/- रुपये व दुसऱ्यांदा ३५००/- रुपये मिळाले त्यानंतर वेळोवेळी मुव्ही तिकीटचे सेट नमुद आरोपीतांनी फि.यांना देवुन ते रेटींग करण्यास सांगुन व वेळोवेळी प्रिपेड टास्क देवुन अकाऊंट मध्ये व युपीआय आयडी मध्ये रक्कम भरण्यास सांगुन फि.यांना बोनस व कमीशनचे आमिष दाखवुन फि.यांना नमुद बॅक अकाऊंट युपीआय आयडी मध्ये रक्कम ट्रान्सफर करण्यास लावुन फि.यांची एकुण २३,०१,८७७/- रुपयाची ऑनलाईन फसवणुक केली. अशा फि.च्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

अपघात–

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | वलगाव १५१/२०२३ कलम २७९,३३७,३३८,४२७ भादवि. | शिराळा फाट्या पासुन २०० मिटर | दि.०८/०५/२०२३ चे १७/१५ वा. माहिती ०८/०५/२०२३ चे १८/०० वा. दाखल ०८/०५/२०२३ चे २२/५३ वा. | समीर खान शाबीर खान वय ३६ वर्ष धंदा कन्ड्रावर ( वाहक) रा.जमील कॉलनी अमरावती. | ट्रक क्र.MH २७ BX ७१८७ चा चालक नामे शेख तनवीर शेख मुस्ताक वय २८ वर्ष रा.उस्मान नगर अमरावती. फरार | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील फिर्यादि यांची एस.टी क्र.MH ४०- y ५४६१ या गाडीवर वाहक म्हणुन ड्युटी असतांना.चांदुर बाजार येथुन प्रवाशी घेवुन अमरावती गेलो.परत अमरावती वरुन प्रवाशी घेवुन वलगाव मार्गी चांदुर बाजार जात असांना. शिराळा फाटा येथे ०४ ते ०५ प्रवाशी उतरुन चांदुर बाजार केडे कडे जात असतांना अंदाजे शिराळ फाटा वरुन २०० मिटरअंरावर सायंकाळी १४/१५ वा. चांदुर बाजार कडुन एक सोळा चाकि ट्रक क्र.MH २७BX ७१८७ रॉंग साईट हलगर्जी पणे व निष्काळीजी पणे चालवुन आमच्या एस.टी ला समोरुन धडक मारली .एस .टी चे एस.टी चालक ने एस.टी.पुर्ण पणे कट्रोल करुन साईटने घेतली त्या मुळे कोणतीही जिवीत हानी न होता. एस.टी .मधिल बसलेले प्रवाशी एकमेकांवर आढळुन जखमी झाले.एस.टी.चालक नामे सैयद सादिक बँच क्र.३०४९५ एस.टी.चांदुर बाजार डेपो.हा गंभीर जखमी झाला छाती ला मार लागाला त्यांना वेळीच ॲम्बुलन्स ने इर्विन दवाखाना येथे उचारा करीता पाठवीले तसेच गाडी मधिल ५० ते ५२ प्रवाशी यांना चांदुर बाजार प्रथमीक आरोग्य केन्द्र येथे उचारा करीता पाठवण्यात आले.एस.टी .महामंडळचे आाणी ट्रक चे नुकसान झाले. अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

इतरः–

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा, अम अप. नं .३२९/२३ कलम १३६ भा. विद्युत कायदा. | यवतमाळ रोडवरील श्री नवाथे यांच्या शेताजवळ व अकोला रोड वरील गणेश आईल मिल. | घटना ता. वेळ दि. ०८.०५.२३ चे रात्री दरम्यान. माहीती वेळ - दि. ०८.०५.२३ चे १९.३० वा. दाखल ता. वेळ दि. ०८.०५.२३ चे २०.३२ वा. | सुमित दिलीपराव निंघोट, वय ३५ वर्षे, व्यवसाय अभियंता. रा. MSEB ऑफिस, नवी वस्ती बडनेरा | अज्ञात. | हकीकत अशाप्रकारे आहे की दि. ३०.०४.२३ रोजी नैसर्गिक पावसाने व वादळाने लघुदाब वाहीनीचे तार तुटले. दि. ०८.०५.२३ रोजी सकाळी अकोला रोड वरील गणेश ऑईल मिल जवळील २००kv च्या रोहित्राचे रस्त्याच्या बाजुला तुटुन पडलेले लघुदाब वाहीनी चे ८०० मिटरचे तार चोरी गेल्याचे कळले. तसेच यवतमाळ रोडवरील श्री नवाथे यांच्या शेताजवळील लघुदाब वाहीनीचे २०० मिटरचे तार एकुण कि अं. ३४५४०/- रू. चे अज्ञात चोराने चोरून नेले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे बडनेरा, अम अप. नं .३३०/२३ कलम १३६ भा. विद्युत कायदा. | कोंडेश्वर रोड | घटना ता.वेळ दि. ०४.०५.२३ चे रात्री दरम्यान. माहीती वेळ दि. ०८.०५.२३ चे १९.३० वा. दाखल ता. वेळ - दि.०८.०५.२३ चे २१.१३ वा. | सुमित दिलीपराव निंघोट, वय ३५ वर्षे, व्यवसाय अभियंता. रा. MSEB ऑफिस, नवी वस्ती बडनेरा | अज्ञात. | हकीकत अशाप्रकारे आहे की दि. ३०.०४.२३ रोजी नैसर्गिक पावसाने व वादळाने लघुदाब वाहीनीचे तार तुटले. दि. ०४.०५.२३ रोजी सकाळी कोंडेश्वर रोड वरील पडलेले विजेचे खांब्याचे वर लागलेले व खाली पडेलेले १.१० किलोमिटरचे ३५००/- रू. किमतीचे तार कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | बडनेरा अप.नं ३३१/२३ कलम १२२ महा. पो का. | आठवडी बाजार, नवी वस्ती, बडनेरा | दि. ०८.०५.२३ चे २०.०० वा . माहीती वेळ - दि. ०८.०५.२३ चे २०.०० वा. दाखल वेळ - दि. ०८.०५.२३ चे २१.५४ वा. | सरतर्फे नापोका शशिकांत शेळके ब.न.१३६० पो,स्टे बडनेरा अम | भरत राजेश मगरे, वय २० वर्षे रा. इंदिरा नगर, जुनी वस्ती, बडनेरा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी एक इसम हा संशयीत रित्या चोरीसारखा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरत असतांना मिळुन आला. त्यास सदर परिसरामध्ये फिरण्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली. सदर इसम हा सुर्योस्त ते सुर्योदया दरम्यान भटकत असतांना मिळुन आल्याने त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्याचे कृत्य कलम १२२ महा.पो.का.प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | पो स्टे गाडगे नगर अमरावती अप क्र ६२०/२३ | मा कोर्ट क्र १७ चे बाहेर अमरावती | सन २०२० पासुन ते दि ०४-०५-२३ चे १५.०० वा दि ०८-०५-२३ चे १६.०६ वा | साहिद खान मोहम्मद सुनुस वय ४२ वर्ष रा हबीब नगर अमरावती | १.रहेमत उल्ला शफिउल्ला खान वय ६० वर्ष २) जुबेर उल्ला खा वय ३५ वर्ष | हकिकत याप्रमाणे आहे की, यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १,२ व ३ हे फिर्यादी ला कोर्टात का जाता म्हणुन त्रास देतात व आरोपी क्र १,२,३ हे फिर्यादीला हि फिर्यादी च्या नातेवाईकाच्या अंगावर धावुन जावुन अश्लील शिवीगाळ करुन केस मागे घे नाहीतर तुम्हाला जिवानिशी ठार मारेल अशी धमकी दिली तसेच अमरावती कोर्ट नं १७ येथे आ क्र २ व आ क्र ४ हे फिर्यादी व |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कलम १९५(अ),२९४, ५०६(ब),३५२ भादवि | | | | ३) इकरामल उल्ला खा वय ३८ वर्ष रा हबीब नगर गल्ली १ अमरावती .<br>४)नवेद खान नदिम खान वय ३२ वर्ष रा पॅराडाईज कॉलनी अमरावती | फिर्यादीच्या नातेवाईकाच्या अंगावर धावून गेले व केस मागे घे नाहीतर जिवानिशी ठार मारेल अशी धमकी दिली. अश्या फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ५ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ६२२/२३ कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ भादवि | अमरावती | दि ०८-०५-२३ चे २०.३० वा दरम्यान<br>दि ०८-०५-२३ चे २२.५८ वा | एक महिला | १) शेख अहमेद शेख रहेमान<br>२) अज्जु उर्फ शेख एजाज शेख सलिम<br>३) शेख अहमेद यांचे जमाई रा अमरावती | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी घरी असतांना फिर्यादीचे पती घराचे बाहेर असतांना जोराचा आवाज आला की नमुद आरोपी फिर्यादीच्या पतीस शिवीगाळ करित मारण्यास आले असता फिर्यादीचे पती घरात भितीच्या कारणाने आत मध्ये आले असता नमुद आरोपी हे फिर्यादीचे घरात जबरदस्ती घुसुन फिर्यादीचे पतीला शिवीगाळ करुन लाथीने मारहान केली व त्याचे हातात लोखंडी तलवार घेवुन शिवीगाळ करुन त्याचे मो सा ने निघुन गेले.अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

जुगारः—

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 12 |
| १ | बडनेरा | अप.नं. ३२८/२३ कलम १२(अ) महा. जु. का. सह कलम १०९ भा. दं. वि . | चिकन मार्केटच्या मागे, आठवडी बाजार नवी वस्ती, बडनेरा. | दि. ०८.०५.२३ चे १५.१५ वा. | दि. ०८.०५.२३ चे १८.५८ वा. | सरतर्फे पोहेका शैलेश मोरे ब.नं.१०२९ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | १)रोशन राजीराम चव्हाण, वय ५० वर्षे, रा. पंचशिल नगर, जुनी वस्ती, बडनेरा. २) सुनिल हंसराज सहारे, वय ३२ वर्षे, पो. बोरगाव, ता इर्नापुर, जि. बालाघाट, ह. मु. अंजगावबारी, अमरावती.<br>३) रिजवान उर्फ रिज्जु कादीम कुरैशी, वय २८ वर्षे, रा कुरैशी नगर, नवी वस्ती, बडनेरा ,<br>४) आसीफ हसन चौधरी, वय २६ वर्षे, रा. मोमीनपुरा, नवी वस्ती, बडनेरा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन १)नगदी १००६०/- रू., २) ५२ ताश पत्ते, कि. अं. २०/- रू. असा एकुण १००८०/- रू. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो स्टे गाडगे नगर | अप क्र ६२१/२३ कलम १२(अ) मजुका | कपिलवस्तु नगर अमरावती | दि.०८.०५.२३ चे १५.०० वा | दि. ०८.०५.२३ चे १७.३८ वा | सरतर्फे पोउपनि संजय डाखोरे पो स्टे गाडगे नगर अमरावती | १) विक्की उर्फ बाबु प्रभुजी तुडलायत वय ३६ वर्ष रा बेलपुरा अमरावती<br>२)अनिल भानुदास ठाकरे वय ५८ वर्ष रा संतोषी नगर अमरावती<br>३)धरम राजु सारसार वय ३० वर्ष रा बेलपुरा अमरावती | हकिकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व स्थळी यातील फिर्यादीला वरली मटका सुरु आहे अशी गुप्त व खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन पोस्टॉप सह रवाना होवुन कपीलवस्तु नगर येथे जुगारवरली मटका चालवणारे नमुद तिन्ही आरोपी मिळुन आले त्याचे कडुन नगदी ३२१० रु व साधे मोबाईल वरली मटक्याच्या चिठ्या असा एकुण ४२१० रु चा माल मिळुन आला.अशा फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. |
| ३ | पो.स्टे नागपुरी गेट | अप क्र २१२/२३ कलम १२(अ) मजुका | अँकेडमिक शाळेचे भिंतीजवळ मोकळ्या जागेत गवळीपुरा अमरावती | दि.०८/०५/२०२३ चे २०/३०वा ते २१.०० वा दरम्याण | दि. ०८/०५/२०२३ चे २२.५१ वा | पोहेकॉ संतोष रामलाल यादव ब.न. १८८ पो.स्टे नागेट अमरावती | हमीद खाँ जरीब खाँ वय-६७ वर्षे रा.यास्मिन नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी याने पोलीस स्टॉप व पंचासक्ष मिळालेल्या गुप्त माहीतीवरुन जुगार रेड केली असता यातील नमुद आरोपी यांचे ताब्यातुन वरली मटका जुगार खेळाचे ५२० रु वरली मटक्याचा चिठ्या -१ एक बॉल पेन किमंत ०५ रु असा एकुण ५२५ रुपये चे माल मिळुन आला वरुन नमुद आरोपीचे हे कृत्य कलम १२ (अ)मजुका प्रमाने होत असुन फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

प्रोव्हीशन :—

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | फ्रेजरपुरा | अप क्र ३२७/२०२३ कलम ६५ (ई) महा. दारुबंदी कायदा | अमरावती | दि.०८/०५/२०२३ चे १३.१५ वा. | दि.०८/०५/२०२३ चे १७.३५ वा | सरतर्फे पो हे कॉ राजुआप्पा बालआप्पा बाहेनकर ब नं ३४२, गुन्हे शाखा अमरावती शहर | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे वरिष्ठांचे आदेशाने पोलीस आयुक्तालय हद्दीत पेट्रोलींग ड्यटीवर असताना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली वरुन नमुद घटनास्थळी जावुन पाहणी केली असता यातील आरोपीत महिला ही घरासमोर अवैदय रित्या दारु विक्री करीत असताना दिसुन आली वरुन तीचे वर प्रोव्ही रेड केली असता तीचे ताब्यातुन ५ नग १८० एमएल च्या देशी दारु टँगो पंच च्या सिलबंद पावट्या व २५ नग च्या ९० एमएल सिलबंद पावटया असा एकुण १४००/-रु चा प्रोव्ही माल मिळुन आल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ३ | नांदगाव पेठ | अप.क्र.१६८/२३ कलम ६५(ई) म.दा.कायदा | शासकीय वसाहत नांदगाव पेठ | दि.०८/०५/२३ चे १८/०० वा.<br><br>दि.०८/०५/२३ चे १८/०० वा. | दि.०८/०५/२३ चे २२/२८ वा. | सरतर्फे पोहेका राजु पां. काळे ब.नं. ८५७ पो.स्टे.नंदगाव पेठ अमरावती शहर | एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे कि घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी सोबत पो.स्टाफसह प्रो.रेड पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक खबर मिळाली कि एक महीला तिचे घरासमोर अवैद्यारीत्या देशी दारु ची विक्री करीत आहे अशा खबरे वरुन नमुद आरोपी महीलेवर पंचास प्रो.रेड केली असता सदर महीला आरोपी अवैद्यारीत्या देशी दारुची विक्री करीत असतांना मिळुन आल्याने तिचे ताब्यातुन एका एका कापडी पिशवी मध्ये ७ नग देशी दारु बाँबी संत्रा पावट्या १८० एम.एल. च्या कि. ५६०/- रु चा माल मिळुन आला अशा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

अकस्मात मृत्यु :—

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| २ | खोलापुरी गेट मर्ग क्र. 16/2023 कलम 174 जा.फौ. | कांडलकर प्लॉट येथील प्रमोद खारकर यांची वाडीत भातकुली रोड अमरावती | बाजीरावजी गोंविदजी पिढेकर वय 70 वर्ष रा. महाजनपुरा गजानन महाराज मंदीराजवळ अमरावती घटना ता. वेळ - दि 08/05/2023 चे 19/00 वा.<br><br>दाखल ता. वेळ - दि. 08/05/2023 चे 23/07 वा. | अरुण बाजीरावजी पिढेकर वय 43 वर्ष रा. महाजनपुरा गजानन महाराज मंदाराजवळ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, आम्ही स.पो.उप.नि. निर्जला ब.न. 934 पो.स्टे. खोलापुरी गेट अमरावती शहर ची आज दि. 08/05/2023 चे 21/00 वा ते 08/00 वा. पावेतो स्टेशन डायरी अंमलदार म्हणुन नाईट ड्युटी असतांना पो.स्टे. ला फिर्यादी नामे अरुण बाजीरावजी पिढेकर वय 43 वर्ष रा. महाजनपुरा गजानन महाराज मंदाराजवळ अमरावती यांनी रिपोर्ट दिला की, त्यांचे वडील मृतक नामे बाजीरावजी गोंविदजी पिढेकर वय 70 वर्ष रा. महाजनपुरा गजानन महाराज मंदीराजवळ अमरावती हे प्रमोद भाऊरावजी खारकर रा. माळीपुरा अमरावती यांच्या भातकुली रोडवरील कांडलकर प्लॉंच जवळ असलेल्या वाडीत गायी म्हशीचे काम करीत होते. तेथे आज दि. 08/05/2023 रोजी सायंकाळी 19/00 वा दरम्यान ते परण पावल्याबाबत फिर्यादीचे पत्नीने फिर्यादीला फोनद्वारे सांगितले. वरुन फिर्यादीने तेथे जावुन पाहीले असता फिर्यादीचे वडील हे मरण पावले होते. व त्यांचे तोंडातुन लाळ बाहेत येत होती. त्यांचे मरणाबाबत फिर्यादीला काही माहीती नसल्याने फिर्यादी हे पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्यास आले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. |